# हवामान आधारीत कृषि सल्ला

## जिल्हा कृषि हवामान केंद्र, ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषि विज्ञान केंद्र,नंदुरबार

दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४

ईमेल: kvk_ndb@yahoo.com

### १०४) जिल्हा: नंदुरबार हवामान आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २८ मार्च, २०२५

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (२९/०३/२०२५ ते ०२/०४/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | २९ | ३० | ३१ | ०१ | ०२ |
| पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ६ | २ |
| कमाल तापमान (अं.से.) | ४० | ४१ | ४० | ३९ | ३८ |
| किमान तापमान (अं.से.) | २१ | २२ | २४ | २५ | २३ |
| ढग स्थिती (आकाश) | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | अंशत: ढगाळ | अंशत: ढगाळ |
| स. सापेक्ष आर्द्रता (%) | ४८ | ४९ | ५० | ४९ | ५० |
| दु. सापेक्ष आर्द्रता (%) | ४१ | ४२ | ४१ | ४२ | ४१ |
| हवेचा वेग (किमी/तास) | ४ | ४ | ५ | ४ | ४ |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| | | |
|---|---|---|
| पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज सारांश | | भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त हवामान अंदाजानुसार जिल्ह्यात दि. ३१ मार्च रोजी तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे. कमाल तापमान ३८ ते ४१ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २१ ते २५ अंश सेल्सिअस पर्यंत राहण्याची शक्यता आहे. |
| पुढील आठवड्याचा विस्तारित श्रेणी हवामान अंदाज | | दि. २ ते ८ एप्रिल २०२५ दरम्यान मध्य महाराष्ट्रात कमाल व किमान तापमान सरासरीएवढे राहण्याची शक्यता आहे. |
| **पीक** | **अवस्था** | **कृषी विषयक सल्ला** |
| सामान्य सल्ला | | जिल्ह्यात ३१ मार्च रोजी तुरळक ठिकाणी हलका स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता असल्याने पक्व झालेली पिके ज्वारी, मका, गहू यांची काढणी व मळणी करून सुरक्षित ठिकाणी ठेवावे |
| संदेश | | पक्वता अवस्थेत असलेल्या पिकांची काढणी करून सुरक्षित ठिकाणी ठेवावे. |
| गहु | पक्वता | पावसाची शक्यता असल्याने गहू पिकाची कापणी व मळणी कंबाईन हार्वेस्टरने करून सुरक्षित ठिकाणी झाकून ठेवावे. |
| रबी मका | काढणी | पावसाची शक्यता असल्याने रबी मका पिकाच्या कणसावरील आवरण पिवळसर पांढरे, टणक झाल्यावर हवामान कोरडे असताना काढणी करून सुरक्षित ठिकाणी झाकून ठेवावे. |
| रबी ज्वारी | काढणी | पावसाची शक्यता असल्याने रबी ज्वारी पिकाच्या कणसाच्या खालील दाणे टणक तसेच दांडा पिवळा झाल्यास हवामान कोरडे असताना काढणी करून सुरक्षित ठिकाणी झाकून ठेवावे. |
| हरभरा | काढणी | पावसाची शक्यता असल्याने पिक परिपक्व झाले असल्यास हवामान कोरडे असताना काढणी व मळणी करून करून सुरक्षित ठिकाणी झाकून ठेवावे. |
| भुईमुग | वाढीची | पावसाची शक्यता असल्याने हवामान कोरडे असताना जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आंतरमशागत करावी. |
| तीळ | वाढीची | पावसाची शक्यता असल्याने हवामान कोरडे असताना जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आंतरमशागत करावी. |
| बाजरी | वाढीची | पावसाची शक्यता असलयाने हवामान कोरडे असताना जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आंतरमशागत करावी. |
| पपई | - | पावसाची शक्यता असल्याने हवामान कोरडे असताना पक्वत असलेल्या फळांची काढणी करून सुरक्षित ठिकाणी ठेवावे. वादळी वाऱ्याची शक्यता असल्याने नवीन लागवड केलेल्या झाडांना आधार देण्याची व्यवस्था करावी. |
| केळी | - | पावसाची शक्यता असल्याने हवामान कोरडे असताना पक्वत असलेल्या फळांची काढणी करून सुरक्षित ठिकाणी ठेवावे. वादळी वाऱ्याची शक्यता असल्याने नवीन लागवड केलेल्या झाडांना आधार देण्याची व्यवस्था करावी. |
| मिरची | - | पावसाची शक्यता असल्याने हवामान कोरडे असताना तसेच वादळी वाऱ्याची शक्यता |

दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४ ईमेल: kvk_ndb@yahoo.com


| | | |
|---|---|---|
| | | असल्याने नवीन लागवड केलेल्या झाडांना आधार देण्याची व्यवस्था करावी. पथारीवर वाळत ठेवलेल्या मिरच्या सुरक्षित ठिकाणी झाकून ठेवाव्यात. |
| चारा पिके | लागवड | पावसाची शक्यता असल्याने हवामान कोरडे असताना चारा सुरक्षित ठिकाणी झाकून ठेवावा. संकरित नेपियर गवत लागवड मार्च महिन्यात करावी. लागवडीसाठी कसदार, मध्यम ते भारी, चांगली निचरा होणारीजमीन निवडावी तसेच सुधारित वाण फुले जयवंत (आर.बी.एन. १३), फुले गुणवंत (आर.बी.एन. २०११-१२) वापर करावा. ९०×६० सें.मी. अंतरावर लागवड करावी. |
| पशुसंवर्धन | - | पावसाची तसेच वादळी वाऱ्याची शक्यता असल्याने जनावरांना सुरक्षित ठिकाणी ठेवावे. जनावरांना नेहमी पिण्यास स्वच्छ पाणी द्यावे. रोगप्रतिबंधक उपाय म्हणून पशूवैद्यकयाच्या सहाय्याने योग्य वेळी लसीकरण करून घ्यावे. |

**स्त्रोत**

**१) हवामान पूर्वानुमान : भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई.**

**ठिकाण : कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार**
**दि. : २८/०३/२०२५**

**स्वाक्षरीत**
**प्रमुखअन्वेषक, ग्रामीण कृषि मौसम सेवा-जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार**

□